भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१३-२०१४/५५**
**डीएनबीएस(पीडी)सीसी.क्र. ३३/एससीआरसी/ २६.०३.००१/ २०१३-२०१४** **जुलै १, २०१३**

**सिक्युरिटायझेशन कंपन्या/रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांना देण्यात आलेल्या सूचना/निदेशांवरील महापरिपत्रक**

आपणस माहितच आहे की ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी रिझर्व बँक अद्यावत केलेली परिपत्रके/अधिसूचना देत असते. रिझर्व बँकेने सिक्युरिटायझेशन कंपन्या/रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांना दिलेल्या व जून ३०, २०१३ पर्यंत अद्यावत केलेल्या परिपत्रकांचा सारांश खाली दिला आहे. सविस्तर परिपत्रके आरबीआयच्या (http://www.rbi.org.in) ह्या वेबसाईटवर टाकण्यात आली आहेत.

आपला विश्वासु

(एन एस विश्वनाथन)
प्रमुख मुख्य महाव्यवस्थापक

अबँकिंग पर्यवेक्षण विभाग, केंद्रीय कार्यालय, २ रा मजला, सेंटर१, डब्लु टी सी, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई – ४०० ००५
फोन -२२१८ २५२६, २२१८९१३१, फॅक्स : २२१५ ०५४०, २२१६ २७६८, ईमेल : dnbs@rbi.org.in

**जोडपत्र**

**(१) सिक्युरिटायझेशन कंपनी किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपनीच्या व्यवसाय सुरु करण्यासाठी पंजीकरण प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज सादर करणे.**

[१] रिझर्व बँकेकडून पंजीकरण मिळवू इच्छिणाऱ्या सिक्युरिटायझेशन कंपन्या किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांनी, ह्या बँकेने विहित केलेल्या नमुन्यात (अधिसूचना क्र. डीएनबीएस-१/सीजीएस(सीएसएम)-२००३ दि. मार्च ०७, २००३ च्या जोडपत्रात दिल्यानुसार) अर्ज भरुन, संबंधित जोडपत्रे/पूरक दस्तऐवज जोडून, प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक, डिपार्टमेंट ऑफ नॉन-बँकिंग सुपरव्हिजन केंद्रीय कार्यालय, भारतीय रिझर्व बँक, केंद्र-१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५ ह्यांचे कडे तो सादर करावा.

**(२) सिक्युरिटायझेशन किंवा ॲसेट रिकन्स्ट्रक्शनचा व्यवसाय करण्यासाठी किमान निज-निधी ठेवला जाणे.**

[२] ह्या बँकेने, अधिसूचना क्र. डीएनबीएस-४/सीजीएम(ओपीए) -२००४ दि. मार्च २९,२००४ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक तत्वात सांगितले होते की, सिक्युरिटायझेशनचा व्यवसाय करण्यासाठी, किमान निजनिधी त्या सिक्युरिटायझेशन किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपनीने मिळविलेल्या किंवा मिळवू इच्छित असलेल्या एकूण वित्तीय ॲसेट्सचा, १५% पेक्षा कमी नसावा (रु १०० कोटींच्या एकूण धर्तीवर, जे कमी असेल तेवढे). मग ते ॲसेट्स सिक्युरिटायझेशन च्या हेतूने स्थापलेल्या एखाद्या ट्रस्टला हस्तांतरित झाले असोत किंवा नसोत. ह्याशिवाय, त्या सिक्युरिटायझेशन किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपनीने त्या ॲसेट्सची वसुली (रियलायझेशन) आणि त्या ॲसेटविरुध्द दिलेल्या सिक्युरिटी-पावतीचे विमोचन केले जाईपर्यंत निजनिधीचा तोच स्तर ठेवलेला असावा. ती सिक्युरिटायझेशन किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपनी, ही रक्कम, त्या ट्रस्टने प्रत्येक योजनेखाली दिलेल्या सिक्युरिटी रिसीट्सबाबत वापरु शकते. ह्यामुळे त्या सिक्युरिटायझेशन किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपनीचा, मिळविलेल्या ॲसेट्समधील भाग (स्टेक) सुनिश्चित असल्याची खात्री होईल.

**(३) सिक्युरिटायझेशन कंपन्या/रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांच्या व्यवसायाची सुरुवात**

[३] ह्या बँकेने, अधिसूचना क्र. डीएनबीएस.६/सीजीएस (पीके)-२००६ दि. ऑक्टोंबर १९, २००६ अन्वये मार्गदर्शक तत्वे दिली होती की, त्या सिक्युरिटायझेशन किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपनीने, पंजीकरण प्रमाणपत्र दिले गेल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत व्यवसाय सुरु करावा. त्या एससी/आरसीने अर्ज केल्यास ही बँक सहा महिन्यांच्या पुढेही अधिक मुदत देऊ शकते परंतु कोणत्याही बाबतीत, पंजीकरण प्रमाणपत्र दिले गेल्याच्या तारखेपासून १२ महिन्यांपेक्षा अधिक नाही,

**(४) सिक्युरिटायझेशन कंपनी/रिकन्स्ट्रक्शन कंपनीद्वारे तिमाही अहवाल पाठविले जाणे**

[४] मिळविलेल्या, प्रतिभूतित केलेल्या व पुनर्रचित केलेल्या ॲसेट्सवरील तिमाही विवरणपत्र एससीआरसी १ व एससीआरसी २ ह्या नमुन्यांमध्ये सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ च्या कलम ३(४) खाली रिझर्व बँकेकडे पंजीकृत झालेल्या, सिक्युरिटायझेशन किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांनी, त्या विवरणपत्राशी संबंधित असलेल्या तिमाहीची अखेर झाल्याच्या १५ दिवसांच्या आत सादर करावयाचे आहे. असे पहिले विवरणपत्र मार्च ३१, २००७ रोजी संपणाऱ्या तिमाहीसाठी असेल.

**(५) एससी/आरसींचे विनियमन - एससी/आरसीद्वारा अहवाल व ऑडिट केलेला ताळेबंद पाठविला जाणे -**

[५] ह्या बँकेकडे पंजीकृत झालेल्या सर्व एससी/आरसींना सांगण्यात आले होते की त्यांनी एससीआरसी १ ह्या तिमाही विवरणपत्रात त्यांच्या निजनिधीची स्थिती दर्शवावी आणि त्याचबरोबर ऑडिट केलेल्या ताळेबंदाची प्रत तसेच मार्च ३१, २००८ पासून सुरुवात करुन ताळेबंद, ऑडिट केलेली लेखा हे ज्या वार्षिक सर्वसाधारण सभेत स्वीकारले गेले त्या तारखेच्या एक महिन्याच्या आत संचालकांचा अहवाल/ऑडिटरचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

[१] डीएनबीएस.पीडी.सीसी १/एसआरसीआर/१०.३०/२००२-२००३ दिनांक एप्रिल २३,२००३

[२] डीएनबीएस पीडी.सीसी २/एसआरसीआर/१०.३०/ २००३-२००४ दिनांक मार्च २९, २००४

[३] डीएनबीएस. पीडी.सीसी.४/एसआरसीआर/१०.३०.०००/२००६-२००७ दिनांक ऑक्टोंबर १९, २००६

[४] डीएनबीएस(पीडी).सीसी क्र.५/एसआरसीआर/१०.३०.०००/२००६-२००७ दिनांक एप्रिल २५, २००७

[५] डीएनबीएस(पीडी)सीसी. क्र.८/एसआरसीआर/१०.३०.०००/२००७-२००८ मार्च ५, २००८

### (६) सिक्युरिटायझेशन कंपन्या/रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांनी उभारलेल्या ट्रस्टद्वारा दिल्या गेलेल्या सिक्युरिटी रिसीट्समध्ये गुंतवणुक

[६] अधिसूचना क्र. डीएनबीएस ५/सीजीएम(पीके) २००६ दि. सप्टेंबर २०, २००६ अन्वये ह्या बँकेने मार्गदर्शक तत्वे दिली होती की, सिक्युरिटायझेशन/रिकन्स्ट्रक्शन कंपनी, सिक्युरिटायझेशनच्या हेतीने स्थापन केलेल्या ट्रस्टने दिलेल्या सिक्युरिटी रिसीट्समध्ये, प्रत्येक योजनेखाली, ५% पेक्षा कमी नसलेली रक्कम गुंतवेल. ह्याची अंमलबजावणी ताबडतोब केली जावी. ज्या एससी/आरसींनीआधीच एसआर दिल्या आहेत त्या एससी/आरसी, ही मार्गदर्शक तत्वे दिल्या गेल्याच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या आत किमान सबस्क्रिप्शनची मर्यादा गाठतील.

### (७) सिक्युरिटायझेशन कंपनी/रिकन्स्ट्रक्शन कंपनीने दिलेल्या सिक्युरिटी रिसीट्सचे नेट ॲसेट मूल्य घोषित करण्यावरील मार्गदर्शक तत्वे

[७] सिक्युरिटायझेशन /रिकन्स्ट्रक्शन कंपनीने दिलेल्या सिक्युरिटी रिसीट्समधील गुंतवणुकींचे मूल्य अर्हतायुक्त संस्थात्मक खातेदारांना कळावे ह्यासाठी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ खाली ह्या बँकेकडे पंजीकृत झालेल्या सिक्युरिटायझेशन /रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांना, सांगण्यात आले होते की त्यांनी दिलेल्या सिक्युरिटी रिसीट्सचे नेट ॲसेट मूल्य नियतकालिक कालावधीने घाोषित करावे.

### (८) एससी/आरसींचे विनियमन - सिक्युरिटी रिसीट्स (एसआर) देतेवेळी करावयाचे प्रकटीकरण.

[८] परिपत्रक डीएनबीएस (पीडी) सीसी क्र. ६/एससीआरसी/१०.३०.०४९/२००६-०७ दि. मे २८, २००७ च्या परिच्छेद ७ व्यतिरिक्त एससी/आरसींना सांगण्यात आले होते की, एसआरच्या बाबतीत गुंतवणुकदारांना सज्ञान संमती घेण्यास मदत व्हावी ह्यासाठी, एससी/आरसींनी द्यावयाच्या ऑफर डॉक्युमेंटमध्ये, ॲसेट्स मिळविण्याची तारीख, ॲसेट्सचे मूल्यांकन व अशा एसआर देतेवेळी एससी/आरसींचे हितसंबंध इत्यादीबाबतचे प्रकटीकरण द्यावे.

### (९) एसएआरएफएईएसआय अधिनियमाच्या कलम ३(४) खाली रिझर्व बँकेकडे पंजीकृत झालेल्या सिक्युरिटायझेशन कंपन्या/रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांनी द्यावयाचे तिमाही विवरणपत्र

[९] मिळालेल्या अनुभवाच्या आधारावर ह्या बँकेने तिच्याकडे पंजीकृत झालेल्या सिक्युरिटायझेशन/रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांद्वारे सादर करावयाच्या तिमाही विवरणपत्रांचे एससीआरसी १ व एफसी आरसी २ नमुने सुधारित केले आहेत. पूर्वीप्रमाणेच ही विवरणपत्रे, संबंधित तिमाहीच्या अखेरपासून १५ दिवसांच्या आत, डिपार्टमेंट ऑफ नॉन बँकिंग सुपरव्हिजन, केंद्रीय कार्यालय, भारतीय रिझर्व बँक, २ रा मजला, बी विंग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा मुंबई ४०० ००५ ह्यांचेकडे सादर करावयाची आहेत. सुधारित नमुन्यामधील असे पहिले विवरणपत्र ३१ डिसेंबर, २००८ ला संपलेल्या तिमाहीसाठी सादर केले जावे.

### (१०) सिक्युरिटायझेशन कंपन्या/रिकन्स्ट्रक्शन कंपन्या (एससी/आरसी) द्वारे वित्तीय ॲसेट्स मिळविणे -स्पष्टीकरणे.

[१०] एखादी सिक्युरिटायझेशन किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपनी, एसएआरएफएईएसआय अधिनियम, २००२ च्या कलम २(१) (क) च्या तरतुदीनुसार एक “बँक” नसते किंवा त्या अधिनियमाच्या कलम २(१) (म) च्या तरतुदीनुसार एक “वित्तीय कंपनीही” नसते. ह्यासाठी, एखाद्या एससी/आरसीने दुसऱ्या एससी/आरसी कडून ॲसेट्स मिळविणे हे एसएआरएफएईएसआय अधिनियम, २००२ च्या अनुसार असत नाही.

थकबाकीची वसुली करण्यासाठी एससी/आरसींद्वारे “ कर्जांची पुनर्रचना करणे हा उपाय एससी/आरसींद्वारे केला जातो. त्यामुळे, केवळ थकबाकी वसुल करण्यासाठी एससी/आरसींनी, मिळाविलेल्या कर्जखात्याची पुनर्रचना करण्यासाठी एससी/आरसीनी त्यांच्या निधीचा वापर करण्यावर कोणतेही बंधन नाही.

[६] डीएनबीएस.पीडी.सीसी ३/एसआरसीआर/१०.३०.०००/२००६-२००७ दिनांक सप्टेंबर २० २००६

[७] डीएनबीएस.पीडी.सीसी क्र.६/एसआरसीआर/१०.३०.०४९/२००६-२००७ दिनांक मे २८, २००७

[८] डीएनबीएस(पीडी)सीसी. क्र. ९ /एसआरसीआर/१०.३०.०००/२००७-२००८ एप्रिल २२, २००८

[९] डीएनबीएस(पीडी)सीसी. क्र. १२/एसआरसीआर/ १०.३०.०००/ २००८-२००९ सप्टेंबर २६, २००८

[१०] डीएनबीएस/पीडी (एससी/आरसी) सीसी. क्र. १३ /२६.०३.००१/२००८-०९ एप्रिल २२, २००९

**(११) मिळविलेल्या ॲसेट्सची वसुली दिलेल्या सिक्युरिटी रिसीट्सचे (एसआर) विमोचन करण्यासाठी असलेल्या कालावधीत वाढ देणे**

[११] "दि सिक्युरिटायझेशन कंपनीज अँड रिकन्स्ट्रक्शन कंपनीज (रिझर्व बँक)मार्गदर्शक तत्वे व निदेश, २००३" च्या परिच्छेद ७(६)(२) अनुसार विहित करण्यात आले आहे की, ॲसेट्सची वसुली (रियलाझेशन) करण्याची योजना, तो ॲसेट मिळविला जाण्याच्या तारखेपासून ५ वर्षापेक्षा अधिक नसेल. ह्या कालावधीत, मिळविलेल्या वित्तीय ॲसेटची वसुली न करु शकलेल्या काही सिक्युरिटायझेशन/रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांनी ह्या बँकेकडे, त्या ॲसेट्सची वसुली करण्यासाठी हा कालावधी वाढवून देण्यासाठी सादरीकरण केले. अशा प्रतिनिधीत्वांचा विचार करुन, तात्पुरता उपाय म्हणून, पाच वर्षे पूर्ण केली असलेल्या एससी/आरसीनी दिलेल्या सिक्युरिटी रिसीट्सच्या (एसआर) बाबतीत ॲसेट्सची वसुली (रियलायझेशन) करण्यासाठी ह्या बँकेने दोन वर्षे वाढवून दिली आहेत.

इतर सर्व एससी/आरसींनी दिलेल्या एसआरसाठी ह्या मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद ७(६)(२) च्या विद्यमान मार्गदर्शक तत्वांच्या तरतुदी लागु असतील.

**(१२) कर्जदाराच्या धंद्याच्या व्यवस्थापनात बदल किंवा सिक्युरिटायझेशन कंपन्या व रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांद्वारे हस्तगत केला जाणे (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे, २०१० वरील मार्गदर्शक तत्वे.**

[१२] भारतीय रिझर्व बँकेने, ह्या विषयावर, प्रथमच परिपत्रक/मार्गदर्शक तत्वे दिली होती व त्यामुळे ह्या बँकेकडे पंजीकृत झालेल्या एससी/आरसींना, ह्या प्रश्नाबाबत, एफएआरएफईएसटी अधिनियम, २००२च्या कलम ९(अ)मधील उपाय अंगिकारण्यास मदत होईल.

**(१३) सिक्युरिटायझेशन कंपन्या व रिकन्स्ट्रक्शनकंपन्या (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे व निदेश, २००३**

[१३] ह्या बँकेने एप्रिल २३, २००३ रोजी दिलेली अधिसूचना क्र २ मध्ये, सिक्युरिटायझेशन/रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांचा विनियमनासाठी एक नमुना साचा दिला होता. अनेक वर्षांच्या अनुभवानंतर आणि ह्या मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करण्यात अशा कंपन्यांना येणाऱ्या अडचणी कमी करण्यासाठी, ह्या अधिसूचनेच्या तारखेपासून पुढील बदल लागु करण्यात आले आहेत.

अ) एससी/आरसींसाठी स्पष्ट करण्यात येते की, त्या त्यांच्या स्वतःच्या खात्यात/पुस्तकात किंवा थेट त्यांनी स्थापन केलेल्या ट्रस्टच्या पुस्तकात ॲसेट्स मिळवू शकतात.

ब) एससी/आरसीद्वारा मिळविलेल्या ॲसेट्सची वसुली करण्याचा कालावधी, त्या एससी/आरसींच्या संचालक मंडळाद्वारे, काही अटींवर ५ वर्षांपासून ८ वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकतो.

क) नाबार्ड व एसआयडीबीआय कडील अतिरिक्त निधी गुंतविण्या/वापरण्यासाठी अधिकतर मार्ग एससी/आरसींना उपलब्ध करुन दिले जात आहेत. एससी/आरसीद्वारे स्वतःच्याच उपयोगासाठी जमीन व इमारतींमध्ये गुंतवणुक करण्यासाठी निजनिधीच्या १०% एवढी कमाल मर्यादा ठेवण्यात आली आहे.

ड) पाच वर्षांच्या किंवा दहा वर्षांच्या अखेरीस वसुली/विमोचन न झालेली सिक्युरिटी रिसीट्स किंवा ॲसेट्स ह्यांना तोट्याचे ॲसेट्स समजणे वैधानिक करण्यात आले आहे.

ई) एससी/आरसींच्या कार्यरीतीमध्ये पारदर्शकता व बाजारातील शिस्त आणण्याच्या उद्देशाने, त्या वर्षामध्ये वसुली झालेल्या ॲसेट्स संबंधीचे अतिरिक्त प्रकटीकरण, त्या वर्षाच्या अखेरीस वसुली न झालेल्या वित्तीय ॲसेट्सचे मूल्य, विमोचनासाठी प्रलंबित असलेल्या सिक्युरिटी रिसीट्सचे मूल्य इत्यादि विहित करण्यात आले आहे.

**(१४) सिक्युरिटायझेशन कंपन्या व रिकन्स्ट्रक्शन कंपन्या (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे व निदेश, २००३.**

[१४]सप्टेंबर २०, २००६ च्या अधिसूचना क्र. ५ मध्ये केलेल्या अंशतः सुधारणेनुसार वैधानिक करण्यात आले आहे की, सिक्युरिटायझेशन कंपनी किंवा रिकन्स्ट्रक्शन कंपनी, एखाद्या योजनेखाली दिल्या गेलेल्या सर्व सिक्युरिटी रिसीट्सचे विमोचन होईपर्यंत, त्या एससी/आरसीने प्रत्येक योजनेखाली व प्रत्येक वर्गाच्या सिक्युरिटी रिसीट्सच्या किमान ५ % सातत्याने धारण सादर करणे.

**(१५) क्रेडिट इन्फर्मेशन कंपन्यांना माहिती सादर करणे.**

[१५] क्रेडिट इन्फर्मेशन कंपन्या (विनियमन) अधिनियम, २००५ च्या कलम २(फ) अनुसार, सिक्युरिटायझेशन कंपन्या/रिकन्स्ट्रक्शन कंपन्याही ईएससी/आरसी देखील "क्रेडिट इंस्टिटयुट"च्या व्याख्येखाली येतात. ह्याशिवाय, क्रेडिट इन्फर्मेशन कंपन्या (विनियमन) अधिनियमानुसार, अस्तित्वात असलेली प्रत्येक क्रेडिट संस्था किमान एखाद्या तरी क्रेडिट इन्फर्मेशन कंपनीची सभासद असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व एससी/आरसींना त्या "क्रेडिट संस्था" असल्याकारणाने, कायद्यानुसार त्यांनी किमान एकातरी क्रेडिट इन्फर्मेशन कंपनीचे सभासद असणे आवश्यक आहे.

[११] डीएनबीएस(पीडी)सीसी. क्र.१४/एसआरसीआर/२६.०१.००१/२००८-२००९ एप्रिल २४, २००९

[१२] परिपत्रक क्र.डीएनबीएस.(पीडी).सीसी. क्र.१७/एससीआरसी/२६.०३.००१/२००९-२०१० दिनांक एप्रिल २१, २०१०.

[१३] परिपत्रक क्र.डीएनबीएस.(पीडी).सीसी. क्र.१८/एससीआरसी/२६.०३.००१/२०० -२०१० दिनांक एप्रिल २१, २०१०.

[१४] परिपत्रक क्र. डीएनबीएस.(पीडी).सीसी. क्र.१९/एससीआरसी/२६.०३.००१/२००९-२०१० दिनांक एप्रिल २१, २०१०.

[१५] परिपत्रक क्र. डीएनबीएस.(पीडी).सीसी. क्र.२३/एससीआरसी/२६.०३.००१/२०१०-२०११ दिनांक नोव्हेंबर २५, २०१०

**(१६) सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ खाली सेंट्रल इलेक्ट्रॉनिक रजिस्ट्री स्थापन करणे.**

[१६] २०११-१२ सालासाठीच्या अंदाजपत्रकाबाबतच्या भाषणात अर्थमंत्र्यांनी केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने, वित्तमंत्रालयाने, अधिसूचना एफ.क्र. ५६/०५/२००७-बीओ-२ दि ३१, २०११ ने सेंट्रल रजिस्ट्रीला अधिसूचित केले आहे. अशी सेंट्रल रजिस्ट्री स्थापन करण्याचे उद्दिष्ट, त्याच अचल मालमत्तेवर निरनिराळी कर्जे घेतल्याने होणारी फसवणुक टाळणे हा आहे.

सेंट्रल रजिस्ट्री ऑफ सिक्युरिटायझेशन ॲसेट रिकन्स्ट्रक्शन अँड सिक्युरिटी इंटरेस्ट ऑफ इंडिया (सीईआरएसएआय) ही कंपनीज अधिनियम १९५६ च्या कलम २५ खाली परवानाप्राप्त अशी सरकारी कंपनी असून, ती सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ च्या (एसएआरएफईएएसआय) तरतुदीखाली सेंट्रल रजिस्ट्री ठेवण्यास व त्यात कार्य करण्यास स्थापन करण्यात आली आहे.

[१६] परिपत्रक क्र. डीएनबीएस. (पीडी).सीसी. क्र. २४/एससीआरसी/२६.०३.००१/२०१०-२०११ दिनांक मे २५, २०११

सिक्युरिटायझेशन कंपन्या/रिकन्स्ट्रक्शन कंपन्याना देण्यात आलेल्या परिपत्रकांची यादी

१. डीएनबीएस.पीडी.सीसी १/एससीआरसी/१०.३०/२००२-०३ दिनांक एप्रिल २३, २००३.

२. डीएनबीएस. पीडी. सीसी .२/एससीआरसी/१०.३०/२००३-०४ दिनांक मार्च २९ , २००४

३. डीएनबीएस. पीडी. सीसी.३/एससीआरसी/१०.३०.०००/२००६-०७ दिनांक सप्टेंबर २० २००६

४. डीएनबीएस.पीडी.सीसी.४/एससीआरसी/१०.३०.०००/२००६-०७ दिनांक ऑक्टोबर १९, २००६

५. डीएनबीएस. (पीडी)सी.सी. क्र.५/एससीआरसी/१०.३०.०००/२००६-०७ दिनांक एप्रिल २५, २००७

६. डीएनबीएस(पीडी) सीसी.क्र.६/एससीआरसी/१०.३०.०४९/२००६-०७ दिनांक मे २८, २००७

७. डीएनबीएस(पीडी) सीसी.क्र.८/एससीआरसी/१०.३०.०००/२००७-०८ दिनांक मार्च ५, २००८

८. डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.९/एससीआरसी/१०.३०.०००/२००७-०८ दिनांक एप्रिल २२, २००८

९. डीएनबीएस (ड)सीसी.क्र.१२/एससीआरसी/१०.३०.०००/२००८-०९ सप्टेंबर २६, २००८

१०. डीएनबीएस/पीडी (एससी/आरसी) सीसी . क्र. १३ /२६.०३.००१/२००८-०९ एप्रिल २२, २००९

११. डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र.१४/एससीआरसी/२६.०१.००१/२००८-०९ एप्रिल २४, २००९

१२. परिपत्रक क्र.डीएनबीएस.(पीडी).सीसी.क्र.१७/एससीआरसी/२६.०३.००१/२००९-२०१० दिनांक एप्रिल २१, २०१०

१३. परिपत्रक क्र.डीएनबीएस.(पीडी).सीसी.क्र.१८/एससीआरसी/२६.०३.००१/२००९-२०१० दिनांक एप्रिल २१, २०१०

१४. परिपत्रक क्र.डीएनबीएस.(पीडी).सीसी.क्र.१९/एससीआरसी/२६.०३.००१/२००९ - २०१० दिनांक एप्रिल २१, २०१०

१५. परिपत्रक क्र.डीएनबीएस.(पीडी).सीसी.क्र.२३/एससीआरसी/२६.०३.००१/२०१० - २०११ दिनांक नोव्हेंबर २५, २०१०

१६. परिपत्रक क्र.डीएनबीएस.(पीडी).सीसी.क्र. २४/एससीआरसी/२६.०३.००१/२०१० - २०११ दिनांक मे २५, २०११

(परिपत्रक क्र. ७, १०,११,१५,१६,२०,२१,२२, २५ आणि २६ हे महापरिपत्रक म्हणून त्या त्या वर्षी इश्यु करण्यात आले.)